## ओळखपत्रांच्या संदर्भात माहितीचा अधिकार कसा वापरावा?

### शब्दावली

- **केंद्रीय माहिती आयोग:-** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. केंद्रीय माहिती आयोग हे केंद्र सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.
- **माहिती:-** कलम २(च) अन्वये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.
- **सार्वजनिक प्राधिकरण:-** *कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याचा अर्थ, --*

  *क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*

  *ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

  *ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

  *घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*

  *(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*

  *(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी आशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.*
- **माहितीचा अधिकार:-** *माहितीचा अधिकार याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये:-*

  *(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;*

  *(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे;*

  *(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;*

  *(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळवणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.*

- **राज्य माहिती आयोग**:- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. राज्य माहिती आयोग हे राज्य सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

### १. पार्श्वभूमी

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांकडून मागवलेली माहिती मिळवून देणे असा आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये माहितीची व्याख्या करण्यात आलेली आहे तर कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याची व्याख्या करण्यात आलेली आहे. संबंधित कलमे खाली पुनरुक्त केलेली आहेत:-

*कलम २(च):- 'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.*

*कलम २(ज):- 'सार्वजनिक प्राधिकरण' याचा अर्थ, --*

*क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*

*ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*

*(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*

*(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.*

### २. ओळखपत्रे म्हणजे काय?

स्वीकारार्ह ओळखपत्रे असलेल्या कागदपत्रांची विस्तृत यादी येथे दूरसंचार मंत्रालयाने पुरवलेली आहे. सर्वसामान्यतः ओळखपत्र म्हणून पुढील कागदपत्रे वापरली जातात:-

क. आधार कार्ड

ख. पारपत्र (पासपोर्ट)

ग. केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदार ओळखपत्र

घ. आयकर खात्याने जारी केलेले पॅन कार्ड

ङ. वाहन चालक परवाना

**३. माहितीच्या अधिकाराखाली ओळखपत्र  मिळवता येते काय?**

होय, माहितीच्या अधिकाराखाली आपले स्वतःचे ओळखपत्र मिळवता येते, परंतु मागितलेल्या प्रतीचा समावेश तृतीय पक्ष माहितीत नसणे अत्यावश्यक आहे. आपण केवळ आपल्या स्वतःच्या ओळखपत्राचे तपशील, स्थिती यासंदर्भातील माहिती मिळवण्यासाठी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करू शकतो आणि असा अर्ज करताना शक्य तेवढे जास्त तपशील पुरवणे अत्यावश्यक आहे कारण त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यास मागितलेले कागदपत्र शोधणे सोपे जाते.

युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया (युआयडीएआय) च्या या अधिकृत संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार:-

*"... जनसांख्यिक व जैवसांख्यिक डेटाचे (रहिवाशाचा वैयक्तिक डेटा) गोपनीय स्वरुप पाहता केवळ ज्या रहिवाशांशी डेटा संबंधित आहे तेच माहिती मागू शकतात. अर्जदाराला काही प्रकरणांमध्ये ओळख सिद्ध करण्यासाठी अतिरिक्त दाखलाही द्यावा लागेल."*

**४. तुम्हाला कोणती माहिती मिळू शकते?**

**क. आधार कार्ड**

तुमच्या आधार कार्डच्या संदर्भात तुम्हाला पुढील ही माहिती मिळू शकते.

१. • ईआयडी क्रमांकाच्या आधारे आधार निर्मिती/ क्रमांकाची स्थिती

२. • आधार पत्राची इलेक्ट्रॉनिक प्रत, म्हणजेच ई-आधार

३. •जारी करणे, पाठवणे आणि प्राप्त होण्याच्या स्थितीचे तपशील

**ख. वाहन चालक परवाना**

श्री सुधीर सिंग विरुद्ध दिल्ली पोलीस या प्रकरणात, अर्जदाराचा वाहन चालक परवाना जारी करण्यास गैरवाजवी विलंब झालेला असताना त्याला वाहन चालक पदावर नोकरी मिळवण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम उपयुक्त ठरला. या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने प्रकरण वेगाने हाताळून अर्जदाराला त्याच्या प्रकरणाच्या स्थितीबाबत माहिती देण्याचे आदेश दिले होते.

**ग. पारपत्र (पासपोर्ट)**

पारपत्राच्या (पासपोर्ट) संदर्भात माहिती मिळवण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाच्या वाणिज्यिक प्रतिनिधी, पारपत्र आणि प्रवेशपत्र (सीपीव्ही) विभाग (कौन्सिलर, पासपोर्ट अँड व्हिसा (सीपीव्ही) डिव्हिजन) यांच्याकडे किंवा पारपत्र कचेरी (पासपोर्ट ऑफिस) यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करणे आवश्यक असते. तुमच्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची प्रगती तुम्ही येथे तपासू शकता.

भारत सरकार विरुद्ध आर जयचंद्रन या प्रकरणात मा दिल्ली उच्च न्यायालयाने असे ग्राह्य धरले की पारपत्राचे तपशील, जन्म प्रमाणपत्राच्या प्रती आणि शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या अभिलेखाच्या प्रती ही व्यक्तिगत माहिती आहे, जिचे जनहित अधिक प्रबळ नसल्यास प्रकटीकरण करण्याने संबंधित व्यक्तीच्या व्यक्तिगततेवर अवांछित अतिक्रमण होते.

**घ. पॅन कार्ड**

श्री एच के शर्मा विरुद्ध आयकर विभाग या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने ग्राह्य धरले की, अर्जदाराने व्यवसायाचे स्वरूप, समभागांच्या वाटणीचे प्रमाण, निधीचे स्रोत, भागीदारीचे तपशील आणि व्यवसाय चालवण्याशी संबंधित योजना यांच्या संदर्भात मागितलेली माहिती व्यक्तीगत स्वरूपाची असून तिच्या प्रकटीकरणाला माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ८(१)(ञ) अन्वये केलेला अपवाद लागू होतो.
सुशीला सिंग विरुद्ध सीआयटी, बोकारो या प्रकरणात देखील केंद्रीय माहिती आयोगाने ग्राह्य धरले की पॅन आणि खाते क्रमांक यांच्या संदर्भातील माहिती व्यक्तिगत माहिती असून कलम ८(१)(ञ) अन्वये तिच्या प्रकटीकरणावर विश्वासपात्र संबंधांमुळे बंदी घालण्यात आलेली आहे. अशी माहिती केवळ व्यापक जनहितासाठीच प्रकट करता येईल.

यावरून असे निदर्शनास येते की माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करणारा/ री अर्जदार केवळ त्याच्या/ तिच्या कागदपत्रांचीच मागणी करू शकतो/ शकते. स्वतःचे तपशील मागण्यावर माहितीचा अधिकार अधिनियमानुसार कोणताही प्रतिबंध नाही.

**ङ. केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेले मतदार ओळखपत्र**

केंद्रीय निवडणूक अयोगकरून माहिती मिळवण्यासाठी आपण येथे ऑनलाईन अर्ज सादर करू शकतो. केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रकाशित केलेल्या या माहिती अधिकार नियम पुस्तिकेमध्ये यासंदर्भात

तपशील दिलेले आहेत. हव्या असलेल्या माहितीच्या स्वरूपानुसार आपण माहितीच्या अधिकाराखाली मुख्य निर्वाचन अधिकारी, जिल्हा निर्वाचन अधिकारी आणि मतदार नोंदणी कचेरी किंवा केंद्रीय माहिती आयोगाकडून माहिती मागू शकतो. मागितलेली माहिती न पुरवल्यास ऑनलाईन अपील सादर करण्यासाठीही तरतूद करण्यात आलेली आहे.

**५. काय करावे आणि काय करू नये?**

**क. अवश्य करण्याच्या बाबी**

१. संबंधित तपशील पुरवावेत. त्यायोगे जन माहिती अधिकाऱ्यास तुमच्या ओळखपत्राचा शोध घेण्यास मदत होईल.

२. आपण केवळ आपल्या स्वतःच्या ओळखपत्राचीच माहिती मागू शकतो.

**ख. टाळण्याच्या बाबी**

१. तृतीयपक्षाची माहिती मागू नये. माहितीच्या अधिकारात अशा माहितीला अपवाद ठरवले आहे.

*माहितीच्या अधिकाराखाली करण्याच्या अर्जाचा नमुना*

नोव्हेंबर ११, २०२१

प्रति,

जन माहिती अधिकारी,
युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया (युआयडीएआय) कार्यालय,
दिल्ली, भारत

महोदय/ महोदया,

खालील माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलाम ६(१) अन्वये मागवण्यात येत आहे. कृपया पुढील माहिती पुरवावी:-

१. पुढील व्यक्तीचा आधार कार्ड क्रमांक:-
नाव:- श्री क्षयज्ञ
जन्मतारीख:- ०५/०७/१९८७
मोबाईल नंबर:- ९८७६५४३२१०

आपला,
श्री क्षयज्ञ

**अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया पुढील बाबी विचारात घ्या:-**

१. आवश्यक असल्यास कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलाम ५(३) अन्वये माहिती मिळवण्यास सहकार्य करावे.

२. माहिती पूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही अन्य खात्याकडे उपलब्ध असल्यास कृपया अर्ज कलम ६(३) अन्वये पूर्णतः किंवा अंशतः संबंधित खात्याकडे अंतरित करावा.